# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या बत्तीसाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि.१७ मार्च, २०११ दुपारी १:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची बत्तीसावी सभा गुरुवार, दि.१७/०३/२०११ रोजी दुपारी १:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सुर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | प्रा. डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन. संचालक म. व वि .वि. मंडळ | सदस्य |
| ५) | प्राचार्य पवार एस. के. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ७) | डॉ. सुर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ९) | डॉ. श्रीमती यजमान्य एस. आर. | सदस्य |
| १०) | श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ११) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १२) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| १३) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १४) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| १५) | डॉ. पुजारी डी. डी. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १६) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

डॉ. पाटील टी. आर. व डॉ. कदम बी. बी. यांनी दूरध्वनीद्वारे या सभेस अनुपस्थित रहाणार असल्याचे कळविल्याने त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

मा.कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ]** **दि.२८ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव :** **दि.२८ फेब्रुवारी, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आल व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ २ ]** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

ठराव : **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ]** **महाराष्ट्र शासनाने विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापक व प्राचार्यांच्या पदांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/ (५०३/१०)विशि-१, दि.०५-०३-२०११ अन्वये कळविल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी : महाराष्ट्र शासनाने विद्यापीठ अनुदान आयोग व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या शिफारशीनुसार राज्यात उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रात कार्यरत पदवी, पदव्युत्तर व पदविका संस्था तसेच अकृषी विद्यापीठे, तंत्रशास्त्र विद्यापीठ यातील अध्यापक व प्राचार्यांच्या पदांच्या नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१०/ (५०३/१०)विशि-१, दि.०५-०३-२०११ अन्वये कळविले आहे.

प्रस्तुत विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या संस्थेच्या/महाविद्यालयाच्या सेवेत कार्यरत असलेल्या प्राचार्य व अध्यापकांना नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या वयोमर्यादेत वाढ करण्याबाबतचे शासन निर्णय या कार्यालयाचे पत्रान्वये कळविण्याची बाब माहितीस्तव).

ठराव : **उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या दि.०५/०३/२०११ रोजीच्या शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०४ ] यशदा व सामाजिकशास्त्रे संकुल सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्यामध्ये कॅपॅसिटी बिल्डींग ऑफ पंचायती राज प्रोजेक्टसंदर्भात मा.कुलगुरुमहोदयांनी सामंजस्य करारासंदर्भात केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणीः यशदा पुणे यांना महाराष्ट्र शासनाने पंचायती विभागाचे स्टेट एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे. कॅपॅसिटी बिल्डींग ऑफ पंचायती राज प्रोजेक्टमध्ये तीन दिवसाचे शिबीर आयोजित करण्यात येणार असून यामध्ये ४० विद्यार्थ्यांचा सहभाग असेल. या शिबीराकरीता होणारा संपूर्ण खर्च यशदा पुणे यांच्याकडून केला जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये नक्कीच भर पडणार आहे असे मा. संचालक सामाजिकशास्त्रे संकूल यांनी कळविले आहे. या शिबीरामुळे विद्यापीठावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. यासंदर्भात सामाजिकशास्त्रे संकूलाने कराराचा मसूदा तयार करुन पुढील कार्यवाहीसाठी यशदा पुणे यांच्याकडे मान्यतेसाठी पाठविलेला आहे. मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव).

**ठराव : मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०५ ] तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

(टिपणी : तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या अर्जावर दि.११.०२.२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. दि. ११.०२.२०११ रोजीच्या बैठकीत सुनावणी झालेल्या तक्रार अर्जा संदर्भातील शिफारशी व तक्रार निवारण समितीकडे प्राप्त होणा-या तक्रारी अर्जाची छाननी करण्यास्तव दि.११.०२.२०११ रोजीच्या बैठकीत उप समिती (छाननी समिती ) गठीत करण्यासाठी दोन सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले .

सदरच्या शिफारसींना स्टॅटयुट ३३५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सबब तक्रार निवारण समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव).

**ठराव : तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी स्विकारुन मान्यता देण्यात आली.**

**[ ०६ ] परीक्षांच्या विविध कामाच्या मानधनात वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

(टिपणी- सोलापूर विद्यापीठाच्या स्थापनेपासून परीक्षेतील विविध प्रकारच्या कामासाठी शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यासाठी ज्या दराने मानधन आदा केले जात होते. त्याच दराचा अवलंब करुन परीक्षा कामाचे मानधन विद्यापीठाकडून आदा करण्यात येत होते. त्यानंतर मध्यंतरीच्या काळात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मानधनामध्ये ५ ते १० टक्के इतकी वाढ करुन त्यानुसार मानधन देय करण्यात आलेले आहे.

सोलापूर/शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांनी त्याचे जा.क्र एसयुटीए/४६/२०१०, दि.२/११/२०१० या पत्रान्वये परीक्षेच्या विविध कामाच्या मानधनात ५० टक्के इतकी वाढ करण्याबाबतची विनंती केली आहे.

उपरोक्त सोलापूर/शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा)ने उत्तरपत्रिकेच्या मानधनाबाबत केलेली विनंती परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली असता खालील प्रमाणे ठराव झाला)

ठराव क्र.१५: परीक्षेच्या विविध कामाच्या मानधनात खालील प्रमाणे वाढ करण्याचे ठरले.

| अ.क्र | पदनाम | पुर्वीचे मानधन | वाढीव मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | पेपर सेटर | ८२.५० Per Set | १००/- |
| ०२ | क्लार्क | रु.७०/- | ८०/- |
| ०३ | शिपाई | रु.५५/- | ५५/- |
| ०४ | पाणीवाला | | १५/-प्रती सेशन<br>३०/- दिवसासाठी |

वरीलप्रमाणे परीक्षा मंडळात ठराव झाला असून सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव).

**ठराव : सदरचा विषय पुनश्चः सादर करावा.**

**[ ०७ ]** **उत्तरपत्रिका मुल्यमापनात सत्र पध्दतीच्या ५० गुणांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन करताना प्रतिदिन उत्तरपत्रिकेची संख्या किमान व कमाल ही मर्यादा ठरविण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

(टिपणी- सोलापूर विद्यापीठाने जून २०१० पासून बी.ए भाग-१, बी.कॉम भाग-१, बी.एस्सी भाग-१ व एम.ए, एम.कॉम भाग-१ या अभ्यासक्रमासाठी सत्र पध्दतीचा स्विकार केलेला आहे व पुढील परीक्षेपासून उर्वरित व्दितीय वर्ष व जुन २०१२ पासून तृतीय वर्गासाठी सत्र पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे सर्व अभ्यासक्रमाकरिता सत्र परीक्षेचा स्विकार केल्याने १०० गुणांच्या ऐवजी ५० गुणांची प्रश्नपत्रिका संच तयार करण्यात येत आहे. १०० गुणांच्या उत्तरपत्रिकेचे मुल्यमापन मर्यादा प्रतिदिन किमान ४० व कमाल ६० आहे व त्यासाठी पदवीस्तरावर (बी.ए, बी.कॉम व बी.एस्सी) मुल्यमापनासाठी रु.६/-प्रति उत्तरपत्रिका व पदव्युत्तर स्तरावर (एम.ए, एम.कॉम व एम.एस्सी) रु.९/- प्रति उत्तरपत्रिका इतके मानधन देण्यात येते. सदर बाब विचारात घेता उत्तरपत्रिकेचे मुल्यमापन आता १०० गुणांच्या ऐवजी ५० गुणांचे होत असून परिश्रम कमी झाले आहे. त्यामुळे ५० गुणांच्या उत्तरपत्रिकेचे मुल्यमापन करताना गुणांचा विचार करता उत्तरपत्रिकेची संख्या प्रतिदिन किमान व कमाल ही मर्यादा ठरविण्याची बाब विषय क्र.१६ अन्वये परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली असता खालील प्रमाणे ठराव झाला).

ठराव क्र.१६: सत्र पध्दतीच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यमापन प्रतिदिन किमान ५० व कमाल ८० इतकी मर्यादा करुन उत्तरपत्रिका तपासणीचे शुल्क खालील प्रमाणे मंजूर करण्यात यावे असे ठरले.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | मार्क | मंजूर केलेले मानधन |
|---|---|---|---|
| ०१ | पदवी | ५० | ५/- |
| ०२ | पदव्युत्तर (एम.ए/एम.कॉम) | ५० | ६/- |

वरीलप्रमाणे परीक्षा मंडळात ठराव झाला असून सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव).

**ठराव :** **सदरचा विषय पुनश्चः सादर करावा.**

**[ ०८ ]** **मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडील संचालक यांचे अंतिम मानधन मर्यादा शिथिल करण्याबाबत तसेच सुरक्षा रक्षकांची नेमणूक व त्याचे कंत्राटी तत्वावर मानधन ठरविण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

टिपणी- मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राकडील संचालक यांच्या सुधारीत मानधनाबाबत धोरणात्मक निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या दि.१८ जून २०१० रोजीच्या सभेतील विषय क्र.२५(६) अन्वये घेण्यात आला. सदरच्या निर्णयात १५,०००/-इतक्या मानधनास मान्यता देण्यात आली होती. सदरची बाब दि.३१ ऑगस्ट, २०१० रोजी झालेल्या परीक्षा मंडळाच्या सभेमध्ये विषय क्र.७ अन्वये नोंद घेण्यासाठी ठेवण्यात आली होती. त्यानुसार परीक्षा मंडळाने ठराव क्र.७ अन्वये नोंद घेऊन ठरावाप्रमाणे मानधनात करण्यात आलेली वाढ विद्यापीठाकडील दि.११/११/२०१० च्या पत्रान्वये सर्व संलग्न महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

मध्यवर्ती मुल्यमापन केद्राकडे निरनिराळया वर्गाचे पेपर मुल्यांकनाचे काम चालू असते. त्यामुळे परीक्षा कामाच्या व्यापकतेमुळे मुल्यमानाच्या कालावधीत वाढ होती. त्यामुळे संचालकाची अंतिम मानधन मर्यादा रु.१५,०००/- ही शिथिल करुन घेण्याची बाब दि.३/३/२०११ च्या परीक्षा मंडळाच्या विचारार्थ सादर केली होती.

त्याचप्रमाणे मुल्यमापन केद्राकडे ५०,००० इतक्या मर्यादेपर्यंत उत्तरपत्रिकेची तपासणी करुन घेण्यासाठी खालील प्रमाणे मनुष्यबळांची आवश्यकता आहे.

| अ.क्र | पदनाम | संख्या | मानधन (प्रतिदिन) |
|---|---|---|---|
| १ | समन्वयक | एक | ४००/- |
| २ | संचालक | एक | ४००/- |
| ३ | लिपिक | दोन | ९०/- |
| ४ | शिपाई | दोन | ५५/- |
| ५ | सुरक्षारक्षक | एक | १२५/- |

वरीलप्रमाणे मध्यवर्ती मुल्यमापन केंद्रातील संचालकाचे मानधन ठरविणे व मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रासाठी मनुष्यबळांची उपलब्धता करुन देण्याची बाब परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली असता खालीलप्रमाणे ठराव झाला.

ठराव क्र. १८(०२) मुल्यमापन केंद्राकडील कामाची व्यापकता लक्षात घेता विषयात नमुद केल्याप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्यात यावे. यापुर्वी सुरक्षारक्षकास मानधन ठरले नव्हते ते आता रु.१२५/- प्रतिदिन मंजूर करावे व संचालकाचे अंतिम मानधन मर्यादा रु.१५,०००/- वरुन २०,०००/- पर्यंत वाढविण्यात यावे असे ठरले.

वरीलप्रमाणे परीक्षा मंडळात ठराव झाला असून सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव).

**ठराव :** **सदरचा विषय पुनश्चः सादर करावा.**

**[ ०९ ]** **श्रेणी सुधार परीक्षेसाठी प्रचलित असलेल्या विद्याशाखा यादीमधील एल.एल.एम व इतर अभ्यासक्रमांची शुल्क रचना करण्याबाबत परीक्षा मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

(टिपणी- प्रस्तुत विद्यापीठामार्फत एम.ए, एम.कॉम, एम.एस्सी (गणित) या अभ्यासक्रमांसाठी श्रेणी सुधार (Class Improvement) परीक्षा घेतली जाते. त्याचप्रमाणे एम.एस्सी भूगोल, एम.सी.ए (Under Engineering) एल.एल.एम, एम.एड व इतर अभ्यासक्रमांच्या श्रेणी सुधार साठी विद्यार्थ्यांकडून वारंवार विद्यापीठाकडे विचारणा होत आहे. त्यामुळे नमुद केलेल्या अभ्यासक्रमांची श्रेणी सुधार परीक्षा घेण्याबाबत व त्याकरिता आवश्यक त्या शुल्कांची संबंधित विद्यार्थ्याकडून आकारणी करण्याबाबतची बाब दि.३/३/२०११ रोजी विषय क्र.११ अन्वये परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवण्यात आली असता खालील प्रमाणे ठराव झाला.

ठराव क्र.११ जे कोर्सेस चालू आहेत. त्याच कोर्सला श्रेणी सुधार परीक्षेची व्यवस्था करुन द्यावी. त्यासाठी खालील प्रमाणे शुल्क आकारणी करण्यात यावे असे ठरले.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | नोंदणी शुल्क | पेपर शुल्क |
|---|---|---|---|
| ०१ | व्यवसायीक अभ्यासक्रम | १,५००/- | १००/- |
| ०२ | अव्यवसायीक अभ्यासक्रम | ०८००/- | १००/- |

वरीलप्रमाणे परीक्षा मंडळात ठराव झाला असून सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव).

**ठराव :** **श्रेणी सुधार परीक्षेसाठी प्रचलित असलेल्या विद्याशाखा यादीमधील एल.एल.एम व इतर अभ्यासक्रमांची शुल्क रचना करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ १० ]** **दुय्यम गुणपत्रिका, दुय्यम पदवी प्रमाणपत्र, स्थलांतर दाखला (एमसी/टीसी) व इतर दुय्यम प्रमाणपत्रे देण्याकरिता विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेण्याची बाब व दुय्यम गुणपत्रिका, दीक्षांत शुल्क, स्थलांतर दाखला (एमसी/टीसी), कागदपत्रे पडताळणी व बहि:स्थ विद्यार्थी नोंदणी शुल्क इत्यादी बाबींच्या शुल्कात इतर विद्यापीठातील प्रचलित शुल्काप्रमाणे वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

(टिपणी- विद्यापीठाने निकाल प्रसिध्द केल्यानंतर मिळालेल्या गुणामध्ये फेरफार करुन बनावट गुणपत्रिका तयार करीत असल्याचे विद्यापीठाच्या निदर्शनास आले आहे. बनावट गुणपत्रिकेची छायांकित प्रत जोडून दुय्यम गुणपत्रिकेची मागणी विद्यापीठाकडे केली जात असल्याचेही उघडकीस आले आहे. या गैरप्रकारास आळा बसावा म्हणून दुय्यम गुणपत्रिका मागणी अर्जासोबत संबंधित विद्यार्थ्याने १००/- स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे ही बाब अनिवार्य करणे गरजेचे आहे. सदर बाब परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली खालील प्रमाणे ठराव झाला.

तसेच दुय्यम गुणपत्रिका, दीक्षांत शुल्क, स्थलांतर दाखला (एमसी/टीसी), कागदपत्रे पडताळणी व बहि:स्थ विद्यार्थी नोंदणी शुल्क इत्यादीचा विचार केला असता महाराष्ट्रातील अन्य विद्यापीठापेक्षा प्रस्तुत विद्यापीठाकडून आकारणी करण्यात येणाऱ्या शुल्कांची रक्कम कमी आहे. त्यामुळे अन्य विद्यापीठाप्रमाणे नमुद केलेल्या सर्व बाबीसाठी शुल्क आकारणी करण्याची बाब विषय क्र.१७ अन्वये परीक्षा मंडळाच्या विचारार्थ ठेवली असता खालील प्रमाणे ठराव झाला.)

ठराव क्र.१७: दुय्यम प्रमाणपत्रे मागणी करतेवेळी विद्यार्थ्यांने अर्जासोबत रु.१००/- च्या स्टॅप पेपरवर प्रतिज्ञापत्र देण्याची बाब अनिवार्य करण्याचे ठरले असून इतर प्रमाणपत्रांची व अन्य बाबींची शुल्कवाढ खालील प्रमाणे करण्यास शिफारस करण्यात आली.

A] बहि:स्थ विद्यार्थी नोंदणी शुल्क वाढविणे:

| अ.क्र. | विद्याशाखा | नोंदणी शुल्क (Registration Fees) | |
|---|---|---|---|
| | | पूर्वीचे शुल्क | वाढीव शुल्क |
| 1 | B.A./B.COM-I | 250/- | 500/- |
| 2 | B.A./B.COM- I&II | 250/- | 500/- |
| 3 | B.A./B.COM- II | 250/- | 500/- |
| 4 | B.A./B.COM- II&III | 250/- | 500/- |
| 5 | B.A./B.COM- III | 250/- | 500/- |
| 6 | M.A/M.COM.-I | 300/- | 600/- |
| 7 | M.A/M.COM.-II | 300/- | 600/- |
| 8 | M.Sc Maths-I | 300/- | 600/- |
| 9 | M.Sc Maths- Each sem I, II,III | 300/- | 600/- |

B] उत्तरपत्रिका छायांकित प्रत शुल्कात वाढ करणे. (Photo Stat Copy)

| अ.क्र | सध्याचे शुल्क | वाढ करण्यात आलेले शुल्क |
|---|---|---|
| १ | प्रत्येक विषयासाठी -१००/- | २००/- |

C] वेगवेगळया प्रमाणपत्रांच्या शुल्कात वाढ करणे.

| अ.क्र | तपशिल | सध्याचे शुल्क | वाढ करण्यात आलेले शुल्क |
|---|---|---|---|
| १ | दुय्यम गुणपत्रिका | ५०/- | २००/- |
| २ | दुय्यम पासिंग प्रमाणपत्र | २५/- | २००/- |
| ३ | पदवी प्रमाणपत्र/दीक्षांत शुल्क | १५०/- | ५००/- |
| ४ | दुय्यम पदवी प्रमाणपत्र | - | १०००/- |
| ५ | स्थलांतर दाखला [मायग्रेशन सर्टिफिकेट] | १००/- | २००/- |
| ६ | स्थलांतर दाखला [टी.सी] | ५०/- | २००/- |
| ७ | तात्काळ पदवी प्रमाणपत्र<br>अ] Professional<br>ब] Non -Professional | <br>१०००/-<br>७००/- | <br>२०००/-<br>१०००/- |

वरीलप्रमाणे परीक्षा मंडळात ठराव झाला असून सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव).

**ठराव :** **दुय्यम गुणपत्रिका, दुय्यम पदवी प्रमाणपत्र, स्थलांतर दाखला (एमसी/टीसी) व इतर दुय्यम प्रमाणपत्रे देण्याकरिता विद्यार्थ्यांकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेण्याची बाब व दुय्यम गुणपत्रिका, दीक्षांत शुल्क, स्थलांतर दाखला (एमसी/टीसी), कागदपत्रे पडताळणी व बहि:स्थ विद्यार्थी नोंदणी शुल्क इत्यादी बाबींच्या शुल्कात वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ११ ]** **श्री. ए.आर. खंडागळे चौकीदार यांना अधिकच्या कामाचे व जबाबदारीच्या कामाचे दरमहा एकत्रित मानधन रु.२५००/- दरमहा देण्याबाबतची बाब विचारार्थ सादर.**

(टिपणी : श्री. ए.आर.खंडागळे यांचा दि.१५/२/२०११ रोजीचा रु. २५००/- मानधन व सुरक्षा इनचार्ज पदाचा चार्ज देण्याबाबत विनंती केली आहे.

१. श्री. ए.आर. खंडागळे चौकीदार यांना जा.क्र. एसयुएस/आस्था/४४९ए दि.२४/४/२००८ अन्वये, स्वतःची डयुटी करुन डयुटी व्यतिरिक्त विद्यापीठ परिसरात ठेकेदारामार्फत नियुक्त केलेल्या एकुण २८ चौकीदारांची डयूटी लावणे, डयुटीच्या व्यतिरिक्त रात्री व अपरात्री स्वतःच्या वाहनाने विद्यापीठात येवून ४८२ एकर जागेची तपासणी करणे, मा.कुलगुरू याच्या निवासस्थानी, अभ्यासकेंद्र येथे जावुन चौकीदारांवर देखरेख करणे चौकीदार अचानक गैरहजर राहील्यास पर्यायी व्यवस्था करणे इ. कामे करण्याबाबत कार्यालयीन आदेश देण्यात आले आहेत.

२.महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि. ०६/०७/२००९ शासन निर्णयान्वये २१० शिक्षकेत्तर पदांच्या आकृतीबंधास मान्यता मिळाली आहे. दि. १८/०९/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये, दि.०६/०९/२००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार मान्यता दिलेल्या २१० शिक्षकेतर पदांच्या आकृतीबंधानुसार चौकीदार ३ पदे निरसित करण्यात आली आहेत. यात सुरक्षा इनचार्ज हे पद नाही.

सबब, क्र १ व २ विचारात घेता, श्री. ए.आर. खंडागळे यांना अधिकच्या व जबाबदारीच्या कामाचे रु २५००/- एकत्रित मानधनाची देण्याबाबतची बाब विचारार्थ).

**ठराव :** **श्री. ए.आर. खंडागळे चौकीदार यांना अधिकच्या जबाबदारीच्या कामाचे दरमहा एकत्रित मानधन रु.२५००/- देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १२ ]** **विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी : विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना : शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१०/ (४८८ / १०)-विशि-१, मंत्रालय, मुंबई दिनांक २८ डिसेंबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत समिती नेमण्यात आली होती.

या समितीचा अहवाल सोबत जोडलेला असुन. त्यानुसार संबधीत कर्मचा-यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ ).

**ठराव :** **विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत नियुक्त समितीचा अहवाल स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ १३ ] शै.वर्ष २०११-१२ पासून विद्यापीठात स्कूल ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट स्टडीज अंतर्गत मास्टर ऑफ कॉमर्स (M.Com) हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: शै.वर्ष २०११-१२ पासून सोलापूर विद्यापीठात स्कूल ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट स्टडीज अंतर्गत मास्टर ऑफ कॉमर्स (M.Com) हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करावयाचा आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (b) अन्वये विद्या परिषदेच्या शिफारसीनुसार व्यवस्थापन परिषदेस विद्यापीठामध्ये सदर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देता येते .

त्या अनुषंगाने शै.वर्ष २०११ - १२ पासून सदर अभ्यासक्रम विद्यापीठात सुरु करुन प्रवेश प्रक्रिया विहीत वेळेत होण्यास्तव म.वि.कायदा १९९४ कलम ३० (e) च्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मा.कुलगुरु यांनी उपरोक्त अभ्यासक्रम सोलापूर विद्यापीठात सुरु करण्यास विद्या परिषदेच्यावतीने मान्यता दिलेली आहे.

सबब शै.वर्ष २०११-१२ पासून सोलापूर विद्यापीठात स्कूल ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट स्टडीज अंतर्गत मास्टर ऑफ कॉमर्स (M.Com) हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : शै.वर्ष २०११-१२ पासून विद्यापीठात स्कूल ऑफ कॉमर्स ॲन्ड मॅनेजमेंट स्टडीज अंतर्गत मास्टर ऑफ कॉमर्स (M.Com) हा दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ] विद्यापीठातील व संलग्नित महाविद्यालयामध्ये नव्याने होणाऱ्या अभ्यासक्रमाचे शुल्क तसेच इतर शुल्काबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून समिती गठीत करण्याबाबत विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-मध्य उप-विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मत्रालय, मुंबई यांच्या दि.१८ ऑगस्ट, २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार पहिल्या विविध प्राधिकरणाचा कार्यकाल दि.३१ ऑगस्ट, २०१० रोजी संपुष्टात आलेला आहे.

विद्यापीठामध्ये आगामी काळात सुरु होणारे अभ्यासक्रम व संलग्नित महाविद्यालयामध्ये सुरु होणाऱ्या अभ्यासक्रमाचे शुल्क विद्यापीठ शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून पाचसदस्यीय समिती गठीत करणे आवश्यक आहे. त्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून सदस्यांच्या नामनिर्देशनाची बाब विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठातील व संलग्नित महाविद्यालयामध्ये नव्याने होणाऱ्या अभ्यासक्रमाचे शुल्क तसेच इतर शुल्काबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांमधून खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.**

**१) प्राचार्य डॉ. भांजे बी. एम.**
**२) प्राचार्य श्री. पवार एस. के.**
**३) डॉ. शिळीमकर टी. एन.**
**४) डॉ. शेख ए. ए.**
**५) श्री. गायकवाड बी. आर.**

**[ १५ ] दंडक ६८ प्रमाणे परिनियम तयार करण्याकरीता व्यवस्थापन परिषदेने समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबत.**

(टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दि.२७/१२/२००५ रोजीच्या बैठकीत विषय क्र. ३ नुसार सदर समितीवर खालील सदस्यांचे नामनिर्देशन केलेले होते.

१. श्री. एन. बी. पवार
२. डॉ. सी. बी. कोळेकर
३. ॲड. रामदास पी. सब्बन

सदर नामनिर्देशित सदस्यांचा कालावधी दि.३१ ऑगस्ट, २०१० रोजी संपुष्टात आलेला आहे.

दंडक ६८ मधील तरतूद खालीलप्रमाणे आहे.

a) The Statutes Committee shall consist of five members nominated by the Management Council, at least three of whom shall be members of the Management Council, and two members of the Board of College and University Development.
b) The Committee shall hold office for five years.
c) The duties and functions of the Committee shall be to consider draft Statutes, Ordinances, Rules and Regulations for being placed before the various authorities and bodies of the University.
d) Any vacancy occurring on the Committee shall be filled by the Management Council only for the remaining part of the period.
e) The Committee shall meet as and when required.

सबब, परिनियम तयार करण्यासाठीच्या समितीवर नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : दंडक ६८ प्रमाणे परिनियम तयार करण्याकरीता व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे नामनिर्देशन केले.**

**१) डॉ. लोणीकर एस. व्ही. : अध्यक्ष**
**२) श्री. गायकवाड बी. आर. : सदस्य**
**३) श्री. सलगर बी. एस. : सदस्य**

**यांना व्यवस्थापन परिषद सदस्यांमधून तर प्राचार्य डॉ. गणगे के. एन. व प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे यांचे महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या सदस्यांमधून नामनिर्देशन करण्यात आले.**

**श्री. नावरे एस. टी., व श्री. राम पवार यांना या समितीवर निमंत्रित म्हणून घेण्याचे ठरले.**

**[ १६ ]** **बीएसएनल एनएमइआयसीटी कार्यप्रणाली विद्यापीठात कार्यान्वित करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: बीएसएनएल एनएमइआयसीटी प्रोजेक्टचा प्रस्ताव Ministry of HRD कडून पुरस्कृत झाला असून सदर प्रणाली घेण्यासाठी होणाऱ्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Total Cost / University | BSNLs Share (Discount) | Ministrys Share | Universities Share |
|---|---|---|---|---|
| 1 | Rs.2 Crore | Rs.20 Lakhs | Rs.1.35 Crores | Rs.45 Lakhs |

विद्यापीठ कार्यालयाकडून बीएसएनएलच्या प्रस्तावावरील तांत्रिक अभिप्राय प्रा. पी. बी. जोशी, संचालक, पदार्थविज्ञान संकूल यांच्याकडून मागविण्यात आलेला असून सोबत जोडला आहे.

सबब, एनएमइआयसीटीची कार्यपणाली विद्यापीठात कार्यान्वित करण्यासाठीची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव :** **बीएसएनल एनएमइआयसीटी कार्यप्रणाली विद्यापीठात कार्यान्वित करण्यासाठीच्या प्रस्तावावरील डॉ. पी. बी. जोशी यांनी दिलेल्या तांत्रिक अभिप्राय विचारात घेवून बीएसएनएल एनएमइआयसीटी कार्यपणाली विद्यापीठात कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १७ ]** **अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर कार्यालयाने तयार केलेली उत्तरे व सदरची उत्तरे अधिसभेच्या सभेत देण्याकरीता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: अधिसभा सदस्यांनी दि.२९ मार्च, २०११ रोजी होणाऱ्या सभेकरीता प्रश्न पाठविलेले आहेत. सदर प्रश्नांची उत्तरे कार्यालयाने तयार केलेली आहेत. परिनियम ४७६ (८) नुसार सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या सभेत व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी द्यावयाची आहेत.

सबब, अधिसभेच्या सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची कार्यालयाने तयार केलेली उत्तरे विचारार्थ व सदर प्रश्नांची उत्तरे अधिसभेच्या सभेत देण्याकरीता व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे नामनिर्देशनास्तव विचारार्थ).

**ठराव :** **सोबत जोडल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे दुरुस्त करण्यात आली व अधिसभेमध्ये त्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी व्य. प. सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

## आयत्या वेळेचे विषय:

**[ १८(१)] वित्त व लेखा समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

(टिपणी: खरेदी समितीची सभा दि.१०/०३/२०११ रोजी दुपारी ३:०० वाजता झाली. या सभेचा कार्यवृत्तांत स्टॅट्यूट ३२४ नुसार वित्त व लेखा समितीच्या समितीच्या व व्यवस्थापन परिषदेच्या समोर मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार दि.१७ मार्च, २०११ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत सदर कार्यवृत्तांत शिफारशीसाठी सादर केला होता.

सबब, वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव : वित्त व लेखा समितीने केलेल्या शिफारशी खालीलप्रमाणे स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

| | |
|---|---|
| **वित्त व लेखा समिती ठराव क्र. २** | **अ) पदार्थविज्ञान संकुलाकडील DAE-BRNS Project संशोधन प्रकल्पातंर्गत Board of Research in Nuclear Science (BRNS) यांच्याकडून मिळालेल्या अनुदानातून Programmable Electrometer (Keithely) हे शास्त्रीय उपकरण रु.३,२५,०००/- (12.5% VAT Extra) या किंमतीला M/s. SAN Instruments, Mumbai यांच्याकडून खरेदी करण्याबाबत वित्त व लेखा समितीची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**<br>**ब) पदार्थविज्ञान संकुलाकडील DAE-BRNS Project संशोधन प्रकल्पातंर्गत Board of Research in Nuclear Science (BRNS) यांच्याकडून मिळालेल्या अनुदानातून Programmable Tubular Vacuum Furnace हे शास्त्रीय उपकरण रु.१,५८,५२०/- (12.5% VAT Extra) या किंमतीला M/s. General Trading Company, Mumbai यांच्याकडून खरेदी करण्याबाबत वित्त व लेखा समितीची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| **वित्त व लेखा समिती ठराव क्र. ३** | **संगणकाच्या किंमती दिवसेंदिवस कमी होत असल्याने विविध कंपनीकडून संगणकाच्या किंमतीची माहिती घेण्यात यावी. सबब, खरेदी समितीने केलेली शिफारस अमान्य करण्यात आली अशी वित्त व लेखा समितीची शिफारस कायम करण्यात आली.** |

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे**
**सचिव, व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**डॉ. बा. पां. बंडगर**
**अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद**

# विषय क्र. १७ वरील ठरावाप्रमाणे तयार करण्यात आलेली प्रश्नोत्तरे

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| १) | **डॉ. चव्हाण सी. एस.** | | नाव : **प्राचार्य श्री. पवार एस. के.** |
| | १ | आपल्या विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर विभागात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास सुवर्ण पदक दिले जाते काय? | नाही. |
| | | ● दिले जात नसल्यास का दिले जात नाही? | सुवर्णपदक देण्यासाठी आजपर्यंत कोणीही देणगीदार पुढे आलेले नाहीत. |
| | | ● सुवर्णपदक देण्यास केव्हा सुरुवात केली जाणार? | योग्य देणगीदार पुढे आल्यानंतर. |
| | २ | महाराष्ट्र शासनाच्या सुधारित कायद्यानुसार B.O.S. चा सदस्य म्हणून नेमणूक होण्यास Ph.D. ही प्रमुख अर्हता आहे काय? | होय. |
| | | ● असल्यास समाजकार्य विभागातील एकमेव Ph.D. धारक प्राध्यापिका डॉ. निशा वाघमारे यांची B.O.S. सदस्यपदी-अध्यक्षपदी निवड का झालेली नाही? | समाजकार्य हे स्थायी अभ्यासमंडळ नसून अस्थायी अभ्यासमंडळ आहे. |
| | | ● एखाद्या अभ्यासमंडळात (स्वीकृत) जर Ph.D. धारक प्राध्यापक उपलब्ध असेल तर त्या अभ्यासमंडळाचा अध्यक्ष विना Ph.D. धारक प्राध्यापकास करता येते काय? | नाही. |
| | ३ | विद्यापीठातील प्रश्नपत्रिकांचे स्वरुप, उत्तरपत्रिका किती तपासाव्यात? त्याचे मानधन किती असावे इ. ठरविण्यासाठी पूर्वीच्या अधिसभेत ठरल्याप्रमाणे समिती नियुक्त केली होती काय? | अधिसभेत सदर समिती नियुक्त करण्याचे ठरलेले नाही. |
| | | ● केली असल्यास समितीने त्यासंबंधी कोणता निर्णय घेतला? | प्रश्न उद्‌भवत नाही. |
| २) | **डॉ. भोसले यु. व्ही.** | | नाव : **श्री. गायकवाड बी. आर.** |
| | ४ | सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयकाची मुदत (कालावधी) किती वर्षासाठी असते? | प्रतिनियुक्तीवरील समन्वयकाची मुदत ३ वर्षासाठी असते. |
| | | ● सोलापूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना समन्वयकाची मुदत कोणत्या कायद्याने अथवा परिनियमाद्वारे वाढविली आहे. | सोलापूर विद्यापीठाचे रा.से.यो. चे समन्वयक प्रतिनियुक्तीवरील नसून अधिकचा कार्यभार म्हणून मानधनावर नियुक्ती असल्याने मुदतीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
| --- | --- | --- | --- |
| ३) | **<u>डॉ. बाड डी. आर.</u>** | | नाव : **श्री. गायकवाड बी. आर.** |
| | ५ | राष्ट्रीय सेवा योजनेची शिबिरे विद्यापीठात महाविद्यालयनिहाय घेण्यात आली. त्याचे खर्चाचे चेक संबंधित महाविद्यालयाकडून संबंधित कॉन्ट्रॅक्टरच्या / केटरर्सच्या नावे Bearer पध्दतीने घेतले. खरे आहे काय? | माहिती मागविण्यात आली आहे. |
| ४) | **<u>डॉ. निंबाळकर व्ही. एच.</u>** | | नाव : **श्री. गायकवाड बी. आर.** |
| | ६ | सोलापूर विद्यापीठाचे स्पोर्टस् कोऑर्डिनेटर यांची मुदत केव्हा संपली? | मुदत लागू होत नाही. |
| | | • मुदतवाढ दिली असल्यास नियमाप्रमाणे प्रक्रिया करुन दिली आहे काय? | सोलापूर विद्यापीठाचे स्पोर्टस् कोऑर्डिनेटर प्रतिनियुक्तीवरील नसून अधिकचा कार्यभार म्हणून मानधनावर नियुक्ती असल्याने मुदतीचा प्रश्नच उद्‌भवत नाही. |
| | | • कायदा / परिनियमाच्या कोणत्या कलमान्वये मुदतवाढ देण्यात आली. | प्रश्न उद्‌भवत नाही. |
| ५) | **<u>डॉ. बचुटे एम. टी.</u>** | | नाव : **प्राचार्य डॉ. गणगे के. एन.** |
| | ७ | सोलापूर विद्यापीठाचे परिनियम तयार करण्यासाठी समिती नेमली आहे काय? | होय. |
| | | • या समितीत कोणते सदस्य आहेत? | १) डॉ. लोणीकर एस. व्ही. : अध्यक्ष<br>२) प्राचार्य डॉ. गणगे के. एन. : सदस्य<br>३) श्री. सलगर बी. एस. : सदस्य<br>४) श्री. गायकवाड बी. आर. : सदस्य<br>५) प्राचार्य डॉ. शेंडगे आर.एन. : सदस्य |
| | | • समिती गठीत केली नसल्यास नवीन समिती स्थापन करणार आहात काय? | प्रश्न उद्‌भवत नाही. |
| ६) | **<u>डॉ. गायकवाड एस. पी.</u>** | | नाव : **प्राचार्य डॉ. गणगे के. एन.** |
| | ८ | कॅप सेंटरसाठी विजेचे बिल किंवा जनरेटरचा खर्च देण्याबाबत विद्यापीठाची भुमिका काय आहे? | यापूर्वीच १२५/- रुपये प्रतिदिन इतक्या खर्चास विद्यापीठाने मान्यता दिली आहे. |
| | ९ | अविष्कार मेळाव्याचा जमा खर्च मंजूर करुन घेतला आहे का? | होय. |
| | | • असल्यास जमाखर्चाचा तपशील द्यावा. | सोबत जमाखर्चाचा तपशील जोडला आहे. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| ७) | **डॉ. बिराजदार बी. एस.** | | नाव : **डॉ. शिळीमकर टी. एन.** |
| | १० | महाराष्ट्र शासनाच्या विद्यापीठ कायद्यानुसार अभ्यासमंडळाच्या चेअरमन-पदासाठी पीएच.डी. ही अट बंधनकारक आहे काय?<br>● पीएच.डी. धारक सदस्य अभ्यासमंडळात असताना पीएच.डी. नसलेल्यांना अभ्यासमंडळाचे चेअरमन होता येते का?<br>● पीएच.डी. पदवीसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास अभ्यासमंडळाचा अध्यक्ष होता येते काय? | होय.<br>नाही.<br>नाही. |
| | ११ | विद्यापीठात भाषा संकुल होण्यासाठी शासन स्तरावर काय प्रयत्न केले आहेत?<br>● भाषा संकुलासाठी कोणत्या विषयांसाठी प्रस्ताव आहेत.<br>● त्या संदर्भातील सद्यस्थिती काय? | नाही.<br>सध्या कोणत्याही नाही.<br>प्रस्ताव समितीची स्थापना करण्यात आली आहे. |
| ८) | **श्रीमती डॉ. कदम एम. एस.** | | नाव : **प्राचार्य डॉ. भांजे बी. एम.** |
| | १२ | किती महाविद्यालयाचे विद्यापीठ अनुदान मंडळाकडे संस्थेने 2F व 12B खाली संलग्नीकरण घेतले आहे?<br>● 2F रजिस्ट्रेशन झाल्यानंतर संलग्नीकरणासाठी महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाकडून स्थानिक चौकशी समितीमध्ये विद्यापीठ कायदा कलम ८१ नुसार संस्थेने काय पायाभूत सुविधा पुरविल्या आहेत? | विद्यापीठ अनुदान मंडळाकडून २९ महाविद्यालयांना 2F व २३ महाविद्यालयांना 12B ची मान्यता आहे.<br>परिनियम ४७६ (२) (बी) नुसार नाकारला. |
| | १३ | विद्यापीठ अनुदान मंडळाच्या नॉर्मनुसार प्राध्यापकांचा पगार संशोधनावर आधारित असल्याने किती प्राध्यापक पीएच्.डी. धारक आहेत?<br>● किती प्राध्यापक विद्यापीठ कार्यक्षेत्रामध्ये नेट/सेट आहेत?<br>● नेट-सेट नसलेल्या प्राध्यापकांसाठी विद्यापीठ अध्यापन व संशोधन मंडळ (BUTR) काय सुविधा पुरविणार आहे? | माहिती मागविण्यात आली आहे.<br>माहिती मागविण्यात आली आहे.<br>काहीही नाही. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | १४ | मी तक्रार निवारण समितीची सदस्या असल्याने गेल्या मिटिंगमध्ये फक्त एकच तक्रार होती; याचे कारण काय?<br>● तक्रार निवारण समितीकडे कर्मचाऱ्यांच्या तक्रारी नाहीत याचा अर्थ विद्यापीठ व विद्यापीठातील सर्व महाविद्यालये तंटामुक्त झाली काय?<br>● का परस्पर तक्रारीचे निवारण केले जाते? | उपरोक्त कालावधीत फक्त एकच तक्रार कार्यालयाकडे आल्याने एकच तक्रार समितीसमोर ठेवली.<br>परिनियम ४७६ (४) (बी) नुसार नाकारला.<br>परिनियम ४७६ (४) (बी) नुसार नाकारला. |
| ९) | **<u>डॉ. काशीद एस. एस.</u>** | | नाव : **डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर.** |
| | १५ | डॉ. एन. बी. पवार यांनी आपला Ph.D. प्रबंध विद्यापीठास केव्हा सादर केला?<br>● प्रबंध सादर केल्यापासून किती दिवसात Viva-voce घेण्यात आला?<br>● प्रबंध सादर केल्यापासून किती दिवसात पदवी मिळाली ? | दि.३१/१२/२००९ रोजी<br>२२३ दिवसानंतर.<br>२२९ दिवसानंतर. |
| | १६ | प्रा. रोंगे बब्रुवाहन पांडूरंग यांना Ph.D. करिताचा गाईड बदलून देताना पूर्वीच्या गाईडची संमती घेतली आहे काय?<br>● गाईड बदलत असताना Ph.D. चा विषय तोच ठेवता येतो काय?<br>● पूर्वीच्या गाईडची संमती नसल्यास त्याचे कारण? | नाही.<br>होय.<br>मतभेद झाल्याने. |
| | १७ | जैवतंत्रज्ञान आणि एम.बी.ए. हे अभ्यासक्रम हा व्यावसायिक अभ्यासक्रम असताना त्यास NET/SET ची अर्हता आवश्यक आहे काय?<br>● जर नेट/सेट अर्हतेची आवश्यकता व्यावसायिक अभ्यासक्रमास नसेल तर त्यांची पूर्णवेळ नियुक्ती का केली जात नाही? | होय.<br>परिनियम ४७६ (४) (बी) नुसार नाकारला. |
| १०) | **<u>डॉ. शिंदे एस. व्ही.</u>** | | नाव : **ॲड. श्री. सलगर बी. एस.** |
| | १८ | सत्र पध्दती लागू केल्यानंतर ५० मार्कांच्या पेपरसाठी विद्यार्थी किती मार्क मिळाल्यानंतर पास घोषित केला आहे?<br>● ऑक्टो/नोव्हें २०११ च्या प्रथम सत्र परीक्षेसाठी १७ वा १८ मार्कांना पास करावे असे संबंधित परीक्षकांना कॅप सेंटरद्वारे कळविले होते काय? | १८ मार्क मिळाल्यानंतर.<br>प्रश्न उद्भवत नाही. |

| अ.क्र. | प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|
| | | • या परीक्षेत १७ मार्क मिळालेल्या उत्तरपत्रिकांचे पुर्नमूल्यांकन (Moderation) केले आहे काय? | प्रश्न उद्‌भवत नाही. |

## प्रश्न क्र. ०९ चे सहपत्र (आविष्कार मेळाव्याच्या जमाखर्चाचा तपशील)

R. DOSHI AND CO.
CHARTERED ACCOUNTANTS

Dial : 2324810,2326335, Fax No 0217-2324924
"CHANDRA RATNA';196/7'Budhwar Peth,
Near Shravika Ashram ,SOLAPUR-413002

**Solapur University , Solapur**
**Avishkar - 2009**
**Inter-University Research Festival**

**Statement showing the Receipts & Payments made Head wise as under**
**(Included in the Main Cash Book of 2009-10)**

| Receipt | Amount received from host universities Rs. | Sr. No. | Payments | Expenditure Rs. |
|---|---|---|---|---|
| Contribution from various Universities of Maharashtra (Rs. 4.00 per student) | 5391698.00 | 1 | Lodging & Boarding | 315684.00 |
| | | 2 | Accommodation | 196905.00 |
| | | 3 | Transportation | 73222.00 |
| | | 4 | Conduct of Event & Inauguration & Valedictory | 957163.00 |
| | | 5 | TADA/ Honorarium to Judges | 75954.00 |
| | | 6 | TADA to Guests/ Scientist | 5805.00 |
| | | 7 | Prizes & Mementoes | 297200.00 |
| | | 8 | Printing & Stationery | 273890.00 |
| | | 9 | Cultural Activity | 34220.00 |
| | | 10 | Contingency | 98689.00 |
| | | 11 | TADA to other committee | 41269.00 |
| | | 12 | F.D. in Central Bank of India, Kondi Branch (Corpus Fund) | 2500000.00 |
| | | 13 | Balance Amount F.D.in Central Bank of of India, Kondi Branch (Corpus Fund) (As per letter) | 521697.00 |
| **Total Rs.** | **5391698.00** | | **Total Rs.** | **5391698.00** |

**CHECKED & FOUND CORRECT**

**CHARTERED ACCOUNTANT**
1-4-10